# दि अण्णासाहेब सावंत

# को–ऑप.अर्बन बँक

# महाड लि;महाड

# लॉकर सुविधा धोरण

## सन २०२४–२०२५

The Annasaheb Savant Co-op Urban Bank Mahad Ltd. Mahad

# दि अण्णासाहेब सावंत को—ऑप.अर्बन बँक महाड लि., महाड

# लॉकर सुविधा धोरण

The Annasaheb Savant Co-op Urban Bank Mahad Ltd. Mahad

**प्रस्तावना**

ग्राहक आपले दागदागिने अन्य मौल्यवान वस्तु घरात ठेवणे सुरक्षित वाटत नसलेमुळे लॉकर सुविधा वापरतात. लॉकर बाबत प्रत्येक बँकेची नियमावली भिन्न आहे मात्र सर्वोच्च न्यायालयाने अमिताभ दास गुप्ता विरुध्द युनायटेड बँक ऑफ इंडिया केस नं.३९६६/२०१०मध्ये दि.१९ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेले निर्णयानुसार रिझर्व्ह बँकेने देशातील सर्व बँकामधील लॉकर बाबत सुधारित नियमावली जारी केली असून त्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया परिपत्रक क्र.RBI/2021-2022/86 DoR.LEG.REC/40/09.07.005/2021-22 दि.१८ ऑगस्ट २०२१ नुसार निर्देशित केलेप्रमाणे धोरण तयार करण्यांत आले असून त्याची अंमलबजावणी दि.०१/०१/२०२२ पासून करण्यांत आली असून सदरचे धोरण सन २०२४—२०२५ करिता राहील.

१. भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांमधील लॉकर्ससाठी एक मार्गदर्शक नियमावली तयार केलेली असून त्या धर्तीवरच संबंधित बँकांनी आपले लॉकर अॅग्रीमेंट तयार केलेले आहे.

२. बॅंक ३ वर्षाचे लॉकर भाडे व गरज पडल्यास लॉकर ब्रेक— ओपन करण्यासाठी येणारा खर्च एवढया मुदत ठेवीचा आग्रह धरु शकेल.

३. लॉकर ज्या ठिकाणी ठेवले आहेत त्या जागेच्या सुरक्षिततेची योग्य व आवश्यक ती काळजी बँकेने घ्यायची आहे. जर चोरी, दरोडा, आग लागणे अथवा बँक कर्मचाऱ्याच्या चुकीने अथवा गैरव्यवहारामुळे लॉकरमधील चीजवस्तू गहाळ झाली तर बॅंकेने त्याची नुकसान भरपाई ग्राहकास देणे बंधनकारक राहील व अशी भरपाई लॉकरच्या वार्षिक भाडयाच्या १०० पट इतकी असेल. उदाहरणार्थ, जर वार्षिक लॉकर भाडे रु.४०००/— असेल व वरीलपैकी कोणत्याही कारणाने जर लॉकरमधील वस्तू गहाळ झाल्या तर

ग्राहकास रु.४ लाख एवढी भरपाई मिळेल. ही भरपाई झालेल्या नुकसानीइतकी असेलच असे नाही.

४. जर भूकंप, चक्रीवादळ, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीने लॉकरमधील चीजवस्तूंचे नुकसान झाल्यास बँक नुकसान भरपाई देण्यास बांधील असणार नाही.

५. लॉकरचा वापर झाल्यावर संबंधित ग्राहकास ब बँकेने रजिस्टर मोबाईल व/किंवा ई–मेल वर लॉकर ऑपरेट झाल्याचा संदेश हा तारीख व वेळ टाकून पाठविणेचा आहे.

६. लॉकरची प्रतिक्षा यादी ग्राहकास सहज उपलब्ध असली पाहिजे व ही यादी बँकेच्या कोअर बँकींग सिस्टीममध्ये (सीबीएस) उपलब्ध असली पाहिजे. जर लॉकर रिकामे असतील तर त्याचीही माहिती ग्राहकास देणे आता आवश्यक असणार आहे.

७. ज्या ठिकाणी लॉकर ठेवले जातात अशा स्ट्रॉंग रुमची योग्य व आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था ठेवणे ही बँकेची जबाबदारी असून अनाधिकृत व्यक्ती स्ट्रॉंग रुममध्ये येणार नाही. यासाठी स्ट्रॉंग रुममध्ये येणाऱ्या व स्ट्रॉंग रुममधून बाहेर जाणाऱ्या व्यक्तीचे सीसीटिव्ही रेकॉर्डिंग करणे आवश्यक आहे.

८. लॉकर ऑपरेटींगचा SMS ग्राहकांचे नोदणीकृत मोबाईलवर गेला असता लॉकर अनाधिकृत व्यक्तीने ऑपरेट केले असल्याची तक्रार झाली असेल तर पोलिस तपास संपेपर्यंत सीसीटिव्ही फुटेज जतन करुन ठेवावे लागणार आहे.

९. लॉकरच्या किल्लीवर बँकेचा आणि शाखेचा आयडेंटिफिकेशन कोड एम्बॉस करणे आवश्यक असणार आहे. यामुळे लॉकर व लॉकरधारक यांचा तपास करणे विविध तपास यंत्रणांना सोपे होऊ शकेल.

लॉकर सुविधा धोरणात रिझर्व्ह बँक परिपत्रकानुसार ग्राहक यथोचित पुर्वतपासणी (Customer Due Diligence), लॉकर वितरण, स्ट्रॉंगरुम सुरक्षितता, लॉकर ऑपरेशनस (ग्राहकांनी लॉकर वापरण्याची पध्दत), वारस नोंद व त्याची अंमलबजावणी, लॉकर व्यवहार बंद करणे, बँकेची देयता, जोखीम व्यवस्थापन, पारदर्शक व्यवहार व ग्राहक मार्गदर्शन या प्रमुख मुद्दयांचा समावेश आहे.

अ. **Customer Due Diligence** (ग्राहक यथोचित पुर्वतपासणी) :–

१.सध्याचे लॉकर धारकांनी रिझर्व्ह बँकेचे आपला ग्राहक ओळखा चे मार्गदर्शक परिपत्रकानुसार आवश्यक पुर्तता केली आहे याची खातरजमा करण्यांत येईल.

२. नवीन लॉकर मागणी बाबत ग्राहक " आपला ग्राहक ओळखा" या धोरणाची पुर्तता करणारे ग्राहकांनाच लॉकर वितरण करण्यांत येईल.

३. लॉकर धारकांना कोणत्याही प्रकारचे अवैध वस्तु लॉकर मध्ये ठेवता येणार नाही व अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेस सदरचा ग्राहक कायदेशिर कारवाईस पात्र राहील ही अट लॉकर करारपत्रात असेल.

४. लॉकर धारकाचा अद्यावत पासपोर्ट साईज फोटो बॅंकेचे दप्तरी असणे आवश्यक आहे व फोटोची योगय ती खातरजमा करुनच बँकेचे अधिकारी लॉकर धारकाला व्यवहार करण्यास अनुमती देतील.

**५. लॉकर धारकांनी मुदतीत करार नुतनीकरण आवश्यक KYC व स्टॅम्प डयूटीसह देणे आवश्यक आहे. अन्यथा लॉकर धारकाला व्यवहार करण्यास अनुमती दिली जाणार नाही.**

ब. लॉकर वितरण :–

१. नवीन लॉकर मागणी करणारे ग्राहकांना त्यांचे सोईचे ठिकाणी लॉकर उपलब्ध करुन देण्याकरिता बँकेचे CBS प्रणालित शिल्लक लॉकरची अद्यावत यादी राहील. अर्ज करणारे ग्राहकांचे मागणी नुसार लॉकर उपलब्ध नसलेस बँक अशी प्रतिक्षा यादी (Waiting List) तयार करील व प्रतिक्षा यादी नुसार नंबर टाकून अर्जाची पोहच दिली जाईल.

२. नवीन लॉकर वितरण करण्यापूर्वी लॉकर भाडे करार दोन प्रतीत करण्यांत येईल व त्यावर लॉकर धारक व ब्रॅच मॅनेजर यांचे सही शिक्यांची नोंद घेऊन मुळप्रत बँकेत जमा राहील व दुय्यम प्रत ग्राहकाला देण्यांत येईल.

क. लॉकर भाडे –

लॉकर धारकांनी लॉकर मिळताच अॅडव्हान्स वार्षीक भाडे जमा करण्याचे आहे व लॉकर धारकांनी भाडे नियमित जमा करणे बंधनकारक आहे. त्यासाठी लॉकर धारकाचे पुढील किमान ३ वर्षाचे भाडे व बंद असलेले लॉकर ब्रेक ओपन करण्याचे झालेस त्याचे खर्चाचा विचार करुन नवीन लॉकर धारकांची प्रती लॉकर कमीत कमी रु.५०००/– इतकी मुदत ठेव लीन मार्क करुन घेणे बंधनकारक राहील. मात्र बँकेचे पुर्वीचे नियमित ग्राहकांना मुदत ठेवीचे बंधन राहणार नाही.

ड. लॉकर युनीट सुरक्षितता –

१. बँकेचे लॉकर युनिट पाऊस, पूर या पासून सुरक्षित राहील याची दक्षता घेण्यांत येईल.

२. लॉकर युनिट ठेवण्यांत आलेले स्ट्रॉंगरुमचा मुख्य दरवाजा CCTV चे कक्षेत राहील याची खबरदारी घेऊन सदरचे फुटेज सुरक्षित ठेवण्यात येईल.

३. लॉकर ऑपरेट करणारे ग्राहकाची ओळख व संगणकीय नोंदी तसेच लॉकर धारकाचे नोंदणीकृत मोबाईलवर लॉकर ऑपरेटिंग बाबत प्रत्येक व्यवहाराचा संगणकीय प्रणालीतून SMS पाठविण्याची पध्दत अवलंबीण्यांत येईल.

४. बँकेकडे सध्या मॅन्युअल ऑपरेटींग लॉकर आहेत. भविष्यात इलेक्ट्रॉनिक लॉक किंवा आधुनिक यांत्रिक लॉकर सुविधा देताना Bureau of Indian Standards (BIS) चे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यांत येईल.

५. लॉकर चावी बँक व शाखा कोड एम्बोस करण्यांत आलेल्या आहेत. नव्याने लॉकर युनिट खरेदी होताच प्रथमतः एम्बॉसींग बाबत योग्य खातरजमा करण्यांत येईल.

इ. लॉकर व्यवहार **(Locker Operations)**

१. लॉकर धारकांनी स्वतःची योग्य ओळख बँकेतील अधिकारी वर्गाला करुन देऊन लॉकर कक्षात प्रवेश करतानाची वेळ नोंद करावी व लॉकर कक्षातून बाहेर येतानाची वेळ नोंद व सही करण्याची आहे.

२. लॉकर व्यवहाराचे वेळी लॉकर धारकांचे बरोबर बँकेचे अधिकारी लॉकर कक्षात प्रवेश करतील बँक अधिकारी आपले चावीचा वापर करुन बाहेर येतील व लॉकर व्यवहारात ग्राहकाला पुर्णपणे गोपनियता राहील याची दक्षता बँक अधिकारी घेतील.

३. प्रत्येक लॉकर व्यवहाराची नोंद SMS व/वा e mail ने संबंधीत ग्राहकाचे नोंदणीकृत e mail व मोबाईलला पाठविण्याकरिता लॉकर धारकांची नोंदणीकृत मोबाईल नंबर व e mail देण्याची जबाबदारी राहील.

**ई. अंतर्गत सुरक्षितता :–**

१. बँकेकडे शिल्लक असलेले लॉकर व सरेंडर करण्यांत आलेले लॉकरच्या चावी बंद लिफाफ्यात राहतील व डुप्लीकेट मास्टर चावी मुख्यालयात सेफ कस्टडीत राहील.

२. लॉकर ऑपरेटींग रजिस्टरच्या नोंदी CBS प्रणालीत रहातील.

३. लॉकर धारकांनी व्यवहारानंतर लॉकर योग्य रितीने बंद केलेला नाही असे बँकेचे अधिकारी वर्गास निदर्शनास आलेस त्याची नोंद लॉकर ऑपरेटींग रजिस्टरला करुन नोंदणीकृत मोबाईलवर SMS व नोंदणीकृत ईमेलवर कळविण्यांत येईल.

**उ. वारस नोंद सुविधा व वारसांचा अधिकार :–**

१. लॉकर धारकांना वारस नोंद (Nomination) सुविधा देण्यांत येईल. याकरिता वारसाची KYC व लेटेस्ट फोटोग्राफ ग्राहकांनी अटेस्टेड करुन देणे आवश्यक राहील तसेच विहीत नमुन्यातील फॉर्मस SLI, SL/A, SL2, SL3, SL3/A वारस नोंदी करिता सांक्षाकित करुन देणारे ग्राहकांनी स्वत:चे सहीने देणे याकरिता साक्षीदार आवश्यक नाही. मात्र सही ऐवजी अंगठा देणारे ग्राहकांनी दोन साक्षीदारांचे सहीने फॉर्म सादर करण्याचे आहेत.

२. वारस नोंदीची संगणक प्रणालीत योग्य नोंद राहील.

३. ग्राहकांनी नोंदविलेले वारस, केलेले बदल व रद्द केलेले वारस नोंदी बाबत पोहच acknowledgment देण्याची आहे.

**ऊ. मयत लॉकर धारकाचे क्लेम :–**

१. लॉकर धारकांनी विहीत नमुन्यातील फॉर्मस सादर करुन वारस नोंदणी केली असलेस सदर वारसाची लेटेस्ट KYC फोटोसह दप्तरी घेण्यात यावी व इंडमिनिटी बॉण्ड दप्तरी घेऊन वारसांचे नावे लॉकर नोंदण्यात यावे. लॉकर धारकांनी वारस नोंदणी केली नसलेस कायदेशीर वारस दाखला घेऊन ज्यां वारसाने मयत लॉकर धारकाचे लॉकर बाबत हक्क मागणी केली असेल अशा व्यक्तीचे नावे लॉकर करण्यापूर्वी अन्य वारसांना नोटीस वजा पत्रव्यवहार करण्यांत येईल तसेच अर्जदाराकडून लेटेस्ट KYC फोटोसह घेणे व इंडमिनिटी बॉण्डची पुर्तता करणेत येईल.

२. लॉकर धारकाचे वारसांकडे लॉकर कि असलेबाबत खातरजमा करावी अन्यथा लॉकर ब्रेक ओपन बाबत असणारे तरतुदी प्रमाणे लॉकर ब्रेक ओपन करुन संबंधित वारसांना नवीन लॉकर कि देण्याची आहे.

३. मयत वारसाचे लॉकर बाबत आलेले क्लेम बाबत पुर्तता करणेस १५ दिवस इतका अधिकतम कालावधी राहील.

४. शाखेकडे आलेले क्लेम त्याची केलेली पुर्तता किंवा काही कायदेशीर बाबी असलेस त्या सर्व नमूद करुन दरमहाचा अहवाल मुख्यालयाकडे पाठविण्याचा आहे व मुख्यालयाचे प्रशासन विभागाने संचालक मंडळास सादर करणेचा आहे.

५. दोन किंवा अधिक व्यक्तिनी संयुक्त रित्या लॉकर धारण केलेले असेल व 'संयुक्त सहीने ' असे व्यवहार अधिकार असतील व त्यापैकी एक व्यक्ती मयत आहे अशा वेळी मयताचे अधिकृत वारसासंबंधी क्लेम पुर्तता होत नाही तोपर्यंत असे लॉकर ऑपरेट करता येणार नाही.

**६. लॉकर धारकाचा वारस खालील बाबींची पुर्तता करीत असेल तरच मयत व्यक्तीचे लॉकर मधील वस्तुंबाबत व्यवहार होईल.**

  १. वारसाबाबत अधिकृत कागदोपत्री पुरावा सादर करणे.

२. कोणत्याही कोर्ट/ मंच ने लॉकर व्यवहारासंबंधी काही आदेश सुचना दिलेल्या नाहीत याची खातरजमा होणे आवश्यक.

३. संयुक्त लॉकर धारकाचे बाबत कायदेशीर अधिकारांची पुर्तता आवश्यक.

**ए. लॉकर धारकाचा वारस अज्ञान असेल तर :–**

१. लॉकर धारकाचा वारस अज्ञान असेल अशा वेळी सदर अज्ञानाचे कायदेशीर पालकांची आवश्यक कायदेशीर बाबींची पुर्तता व इंडीमनेटी बॉण्डची पुर्तता केल्यानंतर लॉकर व्यवहारावेळी दोन साक्षीदारांची उपस्थिती आवश्यक राहील त्यापैकी एक ब बँकेचा अधिकारी (लॉकर व्यवहाराचे काम पहाणारे अधिकारी व्यक्ती) व अज्ञानाचा कायदेशीर पालक असेल.

२. अज्ञानाचे बाबतीत मयत व्यक्तीचे लॉकर मधील स्विकारलेले वस्तुं यादी बाबत व लॉकर रिकामे केले असलेबाबत अज्ञानाचे कायदेशीर पालकांचे स्वतंत्र स्टेटमेंट बँक घेऊ शकेल.

**ऐ. लॉकर बंद करणे/ ब्रेक ओपन करणे :–**

१. **खालील परिस्थितीत बँक लॉकर बंद करील किंवा ब्रेक ओपन करण्यांत येईल.**

अ. लॉकर धारकाची चावी हरविली असलेस लॉकर धारकाचे खर्चाने आवश्यक पुर्तता करुन.

ब. कोर्ट ऑर्डर किंवा शासकीय अंमलबजावणी संस्था (Govt. enforecement agencies) यांचे आदेशानी लॉकर जप्त केले असलेस.

क. लॉकर धारक नियमांचे पालन करीत नसलेचे सिध्द झालेस.

२. लॉकर धारकाची चावी हरविली असलेबाबत त्यांनी बँकेकडे लेखी स्वरुपात दिलेला अर्ज व आवश्यक फी भरणा केलेनंतर बँक लॉकर टेक्निशिअनचे मदतीने लॉकर ब्रेक ओपन करील मात्र यावेळी लॉकर धारक व बँकेचे प्रतिनिधीची उपस्थिती लॉकर कक्षात राहील. तसेच प्रक्रिया पुर्ण झालेची नोंद करुन त्यावर लॉकर धारक व बँक अधिकारी साक्षांकन करतील.

३. कोर्ट वा शासकीय अंमलबजावणी संस्थांचे आदेशानुसार ब्रेक ओपन करण्याची प्रक्रिया असलेस बँक अधिकारी त्यास योग्य सहकार्य करतील.

४. कोर्ट वा शासकीय आदेशाचे अंमलबजरवणीने लॉकर ब्रेक ओपन करण्याचे कारवाईचे वेळी लॉकर धारकांनी उपस्थित राहणेबाबत बँकेकडे उपलब्ध असलेले पत्यावर पत्र, रजिस्टर मोबाईलला SMS वा रजिस्टर ई मेल वर मेल करुन योग्य सुचना देण्यांत येतील.

५. अंमलबजावणी अधिकारी यांचेकडे जप्त लॉकरमधील वस्तु सोपविताना त्याची यादी दोन स्वंतत्र साक्षीदार, बँक अधिकारी व अंमलबजावणी अधिकारी यांचे सही शिक्याचे नोंदीने करण्यांत येईल व सदरच्या वस्तु अंमलबजावणी अधिकारी यांना सुपुर्त केले बाबत लॉकर धारक उपस्थित असलेस त्याना एक प्रत देण्यात येईल व पोहच घेतली जाईल. लॉकर धारक उपस्थित नसलेस बँकेकडे असलेले पत्यावर त्याची प्रत रजिस्टर पोस्ट / स्पीड पोस्टने पाठविण्यांत येईल.

६. ज्या ज्या ठिकाणी आवश्यक असेल त्या ठिकाणी बँक ब्रेक ओपन व्यवहाराचे व्हीडीओ शुटींग करुन भविष्यातील पुराव्याकरिता जतन करुन ठेवील.

**ओ. लॉकर धारकांनी लॉकर भाडे न भरलेस करावयाची कारवाई :—**

१. लॉकर धारकांनी तीन वर्ष वा अधिक कालावधीचे लॉकर भाडे सुचना / नोटीस देऊनही भरणा केले नसलेस अशी कारवाई करण्यांत येईल.

२. लॉकर ब्रेक ओपन बाबत कारवाईची नोटीस बॅकेकडे उपलब्ध असलेले पत्यावर SMS , e mail ने पाठविण्यांत येईल नोटीस देऊनही कारवाई वेळी लॉकर धारक उपस्थित नसलेस कायदेशीर अंमलबजावणी वेळी घ्यावयाचे दक्षतेप्रमाणेच सर्व बाबींची पुर्तता करण्यांत येईल.

३. ब्रेक ओपन केलेले लॉकर मध्ये असणारे चीज वस्तुं यादीसह सदरच्या वस्तु बँकेचे सेफ कस्टडीत ठेवण्यांत येतील. भविष्यात लॉकर धारकांनी मागणी केल्यास त्या त्यांना परत करण्याच्या आहेत व अशा व्यवहारांची योग्य नोंद शाखेचे दप्तरी राहील.

**औ. दिर्घकाळ अन ऑपरेटिव्ह लॉकर बाबत करावयाची कारवाई :–**

१. बँकेचे रिस्क वर्गीकरणानुसार मध्यम रिस्क ग्राहकांनी किमान ३ वर्षातून एकदा व हाय रिस्क वर्गीकरणातील ग्राहकांनी किमान १ वर्षातून एकदा लॉकर ऑपरेट करणे तसे न केल्यास ग्राहकांना त्यांचे पत्यावर नोटीस इश्यु करणेत येईल व लॉकर धारकांचे खुलासा पत्र दप्तरी घेण्यांत येईल.

२. लॉकर धारकांनी आपले लॉकर सात वर्षे अन ऑपरेटिव्ह ठेवले असलेस असे लॉकर ऑपरेट करण्याबाबत सुचना /नोटीस देऊनही दखल न घेतल्यास असे लॉकर ब्रेक ओपन करण्याची कारवाई करण्यांत येईल.

३. लॉकर धारक जरी लॉकर भाडे नियमित भरणा करीत असेल तरी अन ऑपरेटिव्ह लॉकर कारवाईस पात्र राहील.

४. अन ऑपरेटीव्ह लॉकर ब्रेक ओपन करताना यापूर्वी तपशिलवार नमूद केले प्रमाणे ब्रेक ओपन बाबतचे प्रक्रियांचा अवलंब करण्याचा आहे व याबाबतची अट लॉकर करारात नमूद करण्यांत येईल.

**अं. लॉकर धारकास नुकसान भरपाई व बँकेचे उत्तरदायित्व :–**

१. लॉकर युनिट बाबत बँक आवश्यक काळजी घेईल मात्र भुकंप, चक्रीवादळ, पुर अशा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेस तसेच लॉकर धारकाचे निष्काळजी वा बेजबाबदारीमुळे लॉकरचे नुकसान झालेस बँकेची कोणतीही जबाबदारी असणार नाही.

२. चोरी, दरोडा अथवा कोणत्याही प्रकारचा फ्रॉड या कारणास्तव लॉकर धारकाचे नुकसान झालेस प्रथमत: या घटनांची नोंद बँक रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडीया यांचेकडे करील.

३. लॉकर धारकाचे नुकसानीस बँक जबाबदार आहे असा निष्कर्ष झालेस अशी नुकसान भरपाई दयावी लागेल व ही नुकसान भरपाई जास्तीत जास्त ज्या वर्षी नुकसान झाले त्यावेळी असलेले वार्षीक भाडयाचे १०० पट इतकी राहील.

**जबाबदारी व्यवस्थापन, पारदर्शकता व ग्राहक मार्गदर्शन :—**

१. नैसर्गिक आपत्ती व चोरी, दरोडा, फ्रॉड यांचे बाबत उपलब्ध विमा संरक्षण लॉकर धारकांना देण्याकामी प्राधान्याने प्रयत्न करण्यांत येईल.

२. लॉकर करारात आवश्यक पारदर्शकता ठेऊन लॉकर धारक व बँकेचे जबाबदारी बाबत तपशिलवार नमूद करावे.

३. ग्राहकांचे मार्गदर्शनाकरिता लॉकर धोरण लॉकर कराराचा नमुना व अटी शर्थी शाखा कार्यालयात व वेबसाईटला उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य अंमलबजावणी करण्यांत येईल.

४. पूर्वीचे लॉकर धारकांचे करार नुतनीकरण करण्यांत येतील व धोरणानुसार त्याची दुय्यम प्रत लॉकर धारकांना देण्यांत येईल.

**सदर लॉकर धोरणात रिझर्व बँकेकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सुचनांप्रमाणे बदल केला जाईल.**

**संचालक मंडळ सभा ता.१९/०१/२०२५ रोजीचे सभेमध्ये ठराव नं.६१ ने या धोरणास मंजूरी दिलेली असून सदर धोरण दि.०१/०१/२०२५ पासून अंमलात येईल.**

The Annasaheb Savant Co-op Urban Bank Mahad Ltd. Mahad

**(यशवंत चिंतामणी ओजाळे)**
**मॅनेजिंग डायरेक्टर**

**(श्रीमती.शोभा सुधाकर सावंत)**
**अध्यक्षा**

# दि अण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि., महाड

शाखा ____________

## सेफ डिपॉझिट व्हॉल्टबाबत
## भाडे करारनामा

| | |
|---|---|
| दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि., महाड<br>तर्फे<br>श्री. ....................<br>.................... वय .................... वर्षे ....................<br>.................... | करारनामा लिहून घेणारा |
| श्री. ....................<br>....................<br>धंदा .................... वय .................... वर्षे....................<br>राहणार .................... | करारनामा लिहून देणारा |

आजरोजी आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्स लिहून देणार यांनी जिन्नस ठेवण्याकरिता भाड्याने वापरण्यात मिळावा म्हणून विनंती अर्ज केला, तो लिहून घेणार यांनी मान्य करुन लिहून देणार यांस ....................वर्गाचा लॉकर्स नंबर ....................भाड्याने वापरण्यात देण्याचे कबुल केल्यावरुन भाडे करारनामा लिहून देत आहोत, तो असा की.:

१) आपले बँकेतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्स भाड्याने देण्याबाबतचे जे नियम आज अस्तित्वात आहेत ते सर्व आम्ही लिहुन देणार त्यांनी वाचले व ते आम्हांस मान्य आहेत. यापुढे वेळोवेळी रिझर्व्ह बँक, बँकेचे डायरेक्टर बोर्ड जे नियम करतील अगर त्यात ज्या दुरुस्त्या करतील ते नियम व त्या दुरुस्त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. या करारनाम्यात अशा कोणत्याही चालू व पुढे होणाऱ्या नियमांचा व दुरुस्त्यांचा उल्लेख केला नसला व करता येत नसला तरी आम्ही वर मान्यता दर्शवली व बंधन पत्करले, त्यास बाधा येत नाही व त्याप्रमाणे आम्ही वागु.

२) सदर करारनाम्याचे पोटी आज रोजी लिहून देणार यांनी .................... भाडे रुपये .................... अगाऊ द्यावयाचे ते दिले आहेत.

३) करारनाम्याची मुदत आजपासुन .................... आहे. मुदतीपुढे लॉकर्स वापरण्याकरिता लॉकर ठेवण्याचे असल्यास व बँकेने ठेऊ दिल्यास या करारनाम्याची मुदत संपण्यापूर्वी नियमाप्रमाणे अगाऊ भाडे आम्ही लिहून देणार हे भरणा करतील व नियमाप्रमाणे नविन करारपत्र करुन देतील. या प्रमाणे आम्ही न वागल्यास नियमाप्रमाणे आमच्यावर पडणाऱ्या जबाबदारी आम्ही पात्र असू.

४) लिहून देणार यांचे पश्चात आमचे अधिकार ज्या कोणास द्यावयाचे ते अधिकार पत्र आम्ही आपलेकडे निराळे देऊन ठेवले आहे. जरुर लागल्यास ते पुढे बदलून देण्याची आम्ही व्यवस्था करु.

५) आम्ही ठरविलेला सांकेतिक शब्द आपणास कळविला आहे. सदर सांकेतिक शब्द आमचे गौप्य म्हणून आम्ही पाळू. कदाचित आमचे हातून त्यात काही चूक झाल्यास जे नुकसान होईल त्याची सर्व जबाबदारी आमचेवर राहील.

६) लॉकर्सची एक किल्ली (मास्टर की) लिहुन घेणार यांच्याकडे असून दुसरी आपण आम्हास दिली ती आम्ही जतन करू. व हरविल्यास आपणास ताबडतोब कळवू. आमचेकडून किल्ली हरविल्यास लॉकर उघडून घेण्याकरिता होणारा खर्च भरणेंस आमची तयारी आहे. आम्ही लॉकर उघडून न घेतल्यास तो बँकेस उघडून द्यावा लागल्यास होणाऱ्या खर्चास आम्ही जबाबदार आहोत. आमच्या दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेच्या इमारतीचे, लॉकर्स वगैरेचे अगर दुसरे कोणतेही नुकसान झाल्यास ते आम्ही बिनतक्रार भरुन देऊ.

७) कारणपरत्वे लिहुन देणार यांस स्वत: येऊन लॉकर उघडणे शक्य न झाले तर अशा वेळी लॉकर उघडण्याचा अधिकार आमच्यातर्फे ज्या कोणा एका इसमास दिला / द्यावयाचा असेल त्याचे नाव, केवायसी व लेटेस्ट पासपोर्ट साईज फोटो आम्ही स्वत: बँकेत दाखल करीत आहोत करु. एकदा दिलेला मुखत्यार काढून टाकावयाचा झाल्यास किंवा त्याचे ऐवजी दुसरा मुखत्यार नेमावयाचा झाल्यास तशी लेखी नोटीस आम्ही बँकेस आगाऊ दिली पाहीजे. तत्पुर्वी बँकेच्या दप्तरी दाखल असलेल्या मुखत्याराने जे व्यवहार आमच्या करिता केलेले असतील त्याची जबाबदारी आमचेवर आहे बँकेवर नाही. एक मुखत्यार कमी करुन अगर दुसरा मुखत्यार नेमावयाचा झाल्यास तशी लेखी नोटीस आम्ही बँकेस अगाऊ दिली पाहिजे तत्पूर्वी बँकेच्या दप्तरी दाखल असलेल्या मुखत्याराने जे व्यवहार आमच्या करीता केलेले असतील त्याची जबाबदारी आमच्यावर आहे. बँकेवर नाही. एक मुखत्यार कमी करुन अगर दुसरा मुखत्यार नेमतेवेळी जरुर वाटल्यास आम्ही बदलुन घेऊ व तसा तो बँकेने आम्हास बदलुन देणेचा आहे. आम्ही दिलेल्या मुखत्याराच्या कोणत्याही कृत्याची जबाबदारी बँकेचा भाडेकरी या नात्याने सर्वस्वी आमच्यावर आहे. व त्याच्याकडुन बँकेचे जे नुकसान होईल. ते आम्ही बँकेस भरुन देऊ.

८) लिहून देणार यांस वापरण्यास दिलेली लॉकर आम्ही मुदतीत मोकळी करुन न दिल्यास सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबतच्या नियमान्वये तजवीज करुन आपण आमचे खर्चाने व जबाबदारीवर सेफ मोकळी करुन घ्यावी.

९) आजरोजी सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील वर्ग नंबर चे लॉकर वापरण्याकरिता प्रत्यक्ष रीतीने लिहुन देणार यांस या करारनाम्यान्वये लिहून घेणार यांनी दिली व आम्ही ती घेतली आहे.

१०) लिहून देणार यांचे कोणत्याही कृत्यामुळे बँकेचे जे नुकसान होईल त्याचा बोजा लॉकरमध्ये असलेल्या जिन्नसांवर असल्याचे आम्हास कबूल आहे. आम्ही अगर आमच्या करिता आमच्या अधिकृत इसमानी अगर वालीवारस वगैरेनी बँकेचे आमच्याकडे जे येणे होईल ते न दिले तर सदरचे जिन्नस बँकेने नियमाप्रमाणे विकून वसूल करुन घ्यावे व कमी आल्यास ते पुरे करण्यास आम्ही जातीने बांधून घेत आहेत. सदर येणे रक्कम आम्ही न भरल्यास ती आमचे इतर इस्टेटीतून वसुल करुन घेण्यांत यावी.

११) हा करारनामा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्स भाड्याने देण्याबद्दलचे बँकेचे सर्व नियम व या दोहोंमुळे उत्पन्न होणारे आपणा उभयतांचे अंतर्गत परस्पर संबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या व बंधने यांस आम्ही बांधील आहोत. व आमचे पश्चात आमचे वेळोवेळी नेमून दिलेले अधिकृत इसम, वालीवारस, एक्झीक्युटर ॲडमिनिस्ट्रेटर असाईनीस वगैरे सर्व हेही त्यास आमच्याप्रमाणे बांधील राहतील.

# दि अण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि., महाड

आपली बँक... आपली माणसं...!

## * लॉकर भाड्याने देणेबाबत सुधारीत नियम *

दि अण्णासाहेब सावंत कोअ ऑप अर्बन बँक महाड लि. व तिच्या कार्यक्षेत्रातील शाखांमध्ये लॉकर्स भाड्याने उपलब्ध करुन दिले आहेत. त्या संबंधीचे नियम पुढीलप्रमाणे :

१) बँकेच्या सभासदास, बँकेच्या ठेवीदारास व नाममात्र सभासदास भाडे करार पध्दतीने लॉकर्स भाड्याने घेता येईल. यामध्ये प्रामुख्याने बँकेचे सभासद व ठेवीदार यांना प्राधान्य दिले जाईल. यासाठी बँकेच्या विशिष्ट नमुन्यात त्याने अर्ज दाखल केला पाहिजे. तथापि सेफ डिपॉझिट लॉकर भाड्याने देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

२) लॉकर मागणी करणारे अर्जदारांनी रिझर्व्ह बँकेचे आपला ग्राहक ओळखा चे मार्गदर्शक परिपत्रकानुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली पाहिजे तसेच आपल्या लेटेस्ट पासपोर्ट साईज फोटो देणे बंधनकारक राहील.

३) बँक व सेफ डिपॉझिट लॉकर भाड्याने घेणारी व्यक्ती यांचे परस्पर संबंध मालक व भाडेकरु असे असतील. या खात्यापुरते व्यवहार बँकेच्या इतर देवघेवीच्या खात्याहुन स्वतंत्र असल्याने बँक व बँकेचे खातेदार असे त्यांचे परस्पर संबंध असणार नाहीत.

४) लॉकर हे निरनिराळ्या आकारचे व मापाचे असल्याने त्यांचे भाडे बँक वेळोवेळी ठरविल त्याप्रमाणे आकारण्यात येईल. भाडेदरात बदल करण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील. लॉकर भाड्याने देण्याचा करार विशिष्ठ मुदतीपुरताच केला जाईल एक वर्षाहुन कमी असणार नाही. त्यामुळे लॉकर धारकाने लॉकर भाड्याने घेतेवेळी किमान एक वर्षाचे भाडे अगाऊ भरले पाहीजे. मुदत संपल्यानंतर लॉकर पुढे चालू ठेवल्यास अगर परत न केल्यास भाडयाचे रकमेत वाढ झाल्यास सुधारीत दराने भाडयाची आकारणी केली जाईल.

५) विविध आकाराचे लॉकर करीता वेगवेगळे भाडेदर राहतील त्याची योग्य माहिती घेण्यात यावी व आपले लॉकरचे किमान ३ वर्षाचे भाडे व आवश्यकता भासलेस लॉक ब्रेक ओपन करण्याचे झालेस त्याचा आकार या करिता आकारानुसार किमान ५०००/- ते २५०००/- इतकी मुदत ठेव पावती लीन मार्क करुन देणे बंधनकारक राहील व वार्षिक भाडे दरवर्षी आगाऊ जमा करणे आवश्यक राहील.

६) लॉकर धारकाने लॉकर भाड्याची मुदत संपल्यानंतर लॉकरची सुविधा नको असल्यास मुदत संपण्यापूर्वी किमान एक महिना आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे. तसेच मुदत संपण्याचे दिवशी लॉकर धारकाने आपणाकडे असलेले लॉकर रितसर रिकामा करुन दिला पाहिजे. अगर भाडे करारतील अटीस पात्र राहुन मुदत वाढवुन घेतली पाहिजे. तसे न केल्यास लॉकर त्यांच्याकडे भाड्याने राहीलेला आहे असे समजुन नियमानुसार भाडे वसुल केले जाईल. त्याच्याप्रमाणे मुदत संपल्यानंतर नुतिकरण न केल्यास अगर भाडे थकल्यास भाडे भरल्याखेरीज लॉकर धारकास लॉकर उघडू दिला जाणार नाही.

७) लॉकर धारकाने मुदतवाढ एक महिन्याचे कालावधीत न केल्या स अगर भाडे न भरल्यास बँकेतील त्याचे असलेल्या कोणत्याही खात्यातुन भाड्याची रक्कम पूर्व सुचनेशिवाय परस्पर वसुल करुन घेण्याचा बँकेस हक्क राहील.

८) लॉकर भाड्याने घेतलेल्या व्यक्तीस तो लॉकर कोणासही पोटभाड्याने देता येणार नाही.

९) लॉकर धारकास भाड्याने घेतलेल्या लॉकर मध्ये ज्वालाग्रही, स्फोटक, पदार्थ, द्रव्ये तसेच आरोग्य विघातक किंवा धोकादायक वस्तु ठेवता येणार नाहीत. लॉकरमध्ये ठेवल्या जाणाऱ्या वस्तुबाबात बँक अधिकाऱ्यास संशय आल्यास व त्याचे समाधानकारक निराकरण करता न आल्यास बँक अधिकारी यांना अशा वस्तु ठेवण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार राहील.

१०) भाड्याने घेतलेल्या लॉकर मध्ये ठेवल्या जाणाऱ्या मौल्यवान वस्तु कागदपत्र इ. या लॉकर धारकांनी स्वत:चे जबाबदारीवर ठेवयाच्या आहेत. भुकंप, चक्रीवादळ, पुर अगर अन्य नैसर्गिक अपत्तीमुळे किंवा लॉकर व्यवस्थित बंद न करता निघुन गेल्यास होणाऱ्या नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही.

११) लॉकर धारकाने बँकेने दिलेली लॉकरची किल्ली ही व्यवस्थीत सांभाळुन ठेवली पाहिजे. दिलेली किल्ली हरविल्यास व गहाळ झाल्यास अगर कोणत्याही कारणाने अन्य व्यक्तीच्या हाती सापडून काही नुकसान झाल्यास त्यास बँक जबाबदारा राहणार नाही. अशा वेळी त्याने त्वरीत किल्ली हरविल्याबाबत लेखी कळविले पाहिजे. व लॉकरचे कुलुप बदलुन घेतले पाहिजे. त्यासाठी खर्च आगावु बँकेत जमा केला पाहिजे.

१२) लॉकर धारकाने लॉकरमध्ये वस्तू ठेवणे, अगर काढणे ही कामे वाजवी कालावधीत पूर्ण करावीत ज्या जोगे अन्य लॉकरधारकांची गैरसोय होऊ नये. यासाठी साधारणत: पाच ते सात मिनटाहुन अधिक वेळ घालवु नये .

१३) लॉकर धारकाचे कोणत्याही कृत्याने लॉकरचे, व्हॉल्टचे इमारतीचे नुकसान झाल्यास त्याचा खर्च लॉकर धारकाकडुन वसूल केला जाईल.

१४) लॉकर धारकास लॉकर भाड्याने घेतेवेळी वारस नेमता येईल. तसचे स्वत:चे हयातीत नेमून दिलेला वारस बदलता येईल.

१५) सहकारी संस्था, ट्रस्ट यांना बँकेकडील लॉकर्स भाड्याने घेवू शकतील त्याचा वापर करण्यासंबंधीचे अधिकार स्वतंत्र ठरावाने करुन त्याची प्रत व सह्यांचे नमुने व अधिकारी यांची वैयक्तीक के.वाय.सी. स्वतंत्रपणे द्यावी लागेल.

१६) लॉकर धारक व्यक्तीस एक मुखत्यार म्हणुन व स्वत:चे मृत्युनंतर वारस म्हणुन एक व्यक्तिची नियुक्ती करता येईल. यामध्ये बदल करण्याचा अधिकार त्यास राहील. लॉकर धारकाचे अनुपस्थितीत मुखत्यारास लॉकर उघडणे व बंद करणेचा अधिकार राहील. मुखत्याराने केले व्यवहार हे लॉकर धारकावर बंधनकारक राहतील मुळ लॉकरधारक मृत्यु पावल्यास मुखत्यार अगर नियुक्त वारसाने बँकेस लेखी कळविले पाहिजे. तसे न कळविले गेल्यास व मुखत्याराने लॉकरचा वापर केल्यास तो अधिकृत समजला जाईल.

१७) बँकेकडे नमूद असलेल्या मोबईल नंबरवर SMS, ई मेलवर मेल व पत्र व्यवहाराचा पत्ता यावर लेखी नोटीस पोस्टाने/ कुरिअरने पाठवली असता, ती त्या भाडेकऱ्यावर अगर त्याचे अधिकृत इसमावर अगर वारसावर योग्य प्रकारे लागु झाली असे समजण्यांत येईल.

१८) लॉकर वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने लॉकर उघडण्याचा अगोदर लॉकर व्यवहारासाठी ठेवलेल्या रजिस्टरमध्ये लॉकर नंबर व वेळ टाकून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. व बँकेचे अधिकारी यांना ओळख पटवून देणेकामी योग्य सहकार्य करण्याचे आहे. तसेच लॉकरचा वापर करुन परत जाण्याची वेळ याची नोंद करणे आवश्यक आहे.

१९) लॉकरचा वापर झाल्यावर संबंधित ग्राहकास बँकेने रजिस्टर मोबाईल व किंवा/ ई-मेल वर लॉकर ऑपरेट झाल्याचा संदेश हा तारीख व वेळ टाकुन पाठविणेचा आहे.

२०) लॉकर मागणी अर्ज वेळी ग्राहकाने मागणी केलेले शाखेत लॉकर उपलब्ध नसतील तर अन्य शाखेतील उपलब्ध लॉकर बाबत माहीती देण्यात येईल. वा तसेच ग्राहकांची प्रतिक्षा यादी करण्यात येईल. व प्रतिक्षा यादीतील नंबर नमुद करुन पोहच देण्यात येईल.

२१) लॉकर ज्या ठिकाणी ठेवले आहेत त्या जागेची सुरक्षितता घेण्याची योग्य जबाबदारी बँक पार पाडील चोरी ,दरोडा, आग लागणे,यांचा विमा उतरविण्यात येईल.मात्र या कारणानी ग्राहकास नुकसान झाले आवश्यक कायदेशीर माहीती व पुरावे सादर करुन ग्राहक नुकसान भरपाईची मागणी करु शकतील. व अशी नुकसान भरपाई ग्राहक लॉकर करीता जे वार्षिक भाडे भरीत असेल त्याचे कमाल १०० पट किंवा ग्राहकाचे प्रत्यक्ष नुकसान यापैकी जी कमी रक्कम असेल ती रक्कम पात्र राहील.

२२) लॉकर धारकानी वार्षिक भाडे नियमित ॲडव्हान्स भरणा करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर किमान ३ वर्षातुन एक वेळ लॉकर ऑपरेट करणे आवश्यक राहील.

२३) वरील नियमात अगाऊ सुचना न देता फेरबदल करण्याचा अगर जादा नियम घालण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळाने आपणाकडे राखुन ठेवलेला आहे.

| THE ANNASAHEB SAVANT CO-OP URBAN BANK MAHAD | | |
|---|---|---|
| AVAILABLE LOCKER INFORMATION AS ON 31.08.2025 | | |
| SR NO | BRANCH NAME | AVAILABLE LOCKER |
| 1 | MAHAD | 31 |
| 2 | SHIRIWARDHAN | 31 |
| 3 | MURUD | 35 |
| 4 | POLADPUR | 20 |
| 5 | MHASALA | 41 |
| 6 | BIRWADI | 51 |
| 7 | PALI | 0 |
| 8 | PANVEL | 119 |
| 9 | MOHOPADA | 52 |
| 10 | KHOPOLI | 17 |
| 11 | MANGAON | 57 |
| 12 | NERAL | 42 |
| 13 | PEN | 29 |
| 14 | ALIBAG | 67 |
| 15 | URAN | 52 |
| 16 | ROHA | 33 |
| 17 | KARJAT | 0 |
| 18 | TUDIL | 44 |
| 19 | NIJAMPUR | 7 |
| 20 | BORLIPANCHTAN | 60 |
| 21 | MANDANGAD | 32 |
| 22 | PIRANGUT | 35 |
| 23 | TALA | 43 |
| 24 | NAVENAGAR | 3 |
| | **TOTAL** | 901 |

(संदीप म. शेलार)
डेप्युटी जनरल मॅनेजर